# महाराष्ट्रातील मराठ्यांच्या संस्थानांची ग्रामपातळीवरील प्रशासकीय कार्ययंत्रणा

श्री. नंदकिशोर रमाकांत एकबोटे

मराठ्यांची प्रशासकीय कार्ययंत्रणा (छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, छत्रपती शाहुमहाराज यांच्या काळात) इ. स. १६८० ते १७५० या कालखंडात सामाजिक व आर्थिक घडामोडींचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होय. खेड्यांमध्ये शेते हा मुख्य व्यवसाय होता. खेड्यांचा उल्लेख काही वेळेला ग्राम किंवा मौजा या शब्दांनी करत असत. उदा. एखाद्या खेड्याचा विकास झाला असेल व त्यामुळे दोन स्वतंत्र खेडी झाली असतील तरीसुद्धा खेड्याचे मूळचे नाव बदलत नसे म्हणजेच जे जुने खेडे आहे, त्याच्यापुढे बुद्रुक असे लावत असत आणि खुर्द नव्या खेड्याच्या पुढे लावत असत. उदा. पुरंदर तालुक्यातील मावडी बुद्रुक व मावडी खुर्द.



ग्रामामध्ये साधारणतः चार सत्ता चालत असत.

१. दिवाणसत्ता या सत्तेमध्ये हवालदार, कारकून यांचा समावेश होतो. गावाचे संरक्षण करणे हे दिवाणसत्तेचे काम असे.

२. गोतसत्ता किंवा ग्रामसत्ता या सत्तेमध्ये वतनदार, बलुतेदार आणि रयत म्हणजे प्रजा यांचे काम चालत असे.

३. ज्ञानीसत्ता किंवा धर्मसत्ता या सत्तेमध्ये ग्रामामध्ये घडणाऱ्या ज्ञानी आणि धर्मसंदर्भात चर्चा होऊन न्याय होत असे.

४. व्यापारीसत्ता ही सत्ता ग्रामाचे दळणवळणाचे कार्य बघत असे.[१]

वरील चार सत्तांशिवाय वतनदार हा परंपरागत त्याचा अधिकार चालवत असे कारण एखाद्या वतनदाराच्या वतनामध्ये अनेक ग्रामे येत असत व या वतनामध्ये प्रशासकीय कामकाजाकरता पुढील यंत्रणा असे.

**१. पाटील :-** पाटील म्हणजे गावचा राजा. पाटलाचा संबंध संपूर्ण गावाच्या वसाहतीशी असे. गावातील शेतीमधील लावणी, संचणी व उगवणी ही पाटलाची मुख्य कामे असत. गावातील पडीक किंवा वांझोटी जमीन लागवडीखाली आणून त्यातून उत्पन्न निर्माण करणे, हे त्याचेच काम असे. कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला त्याच्या परवानगीशिवाय शेतसारा ठरवता येत नसे. पाटील व कुलकर्णी मिळून गावाचे अंदाजपत्रक तयार करीत असत. सरकारदरबारी गावाचे प्रतिनिधित्व पाटीलच करत असत. कारण ग्रामसत्तेचा प्रमुख पाटीलच होता. संपूर्ण गावचा सारा वसूल करणे व सरकारात जमा करणे व त्याचप्रमाणे एखाद्या वर्षी साऱ्याची रक्कम जमली नाही तर पाटलाला स्वत:ला भरावी लागत असे. गावाचा न्यायनिवाडा त्याच्याशिवाय पूर्ण होत नसे. शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी पाटलाचीच असे. पाटील हा सामान्यत: मराठा असे. क्वचितप्रसंगी महार जातीकडे पाटीलकीचे वतन असे. उदा. वाई परगण्यातील नागेवाडीच्या पाटीलकीची सनद एका महाराकडे असण्याची माहिती आहे.[२] गावाला पाटील नसेल तर ती कामे देशमुख करीत.

**२. कुलकर्णी :-** कुलकर्णी हा गावचा दुसरा अधिकारी असे. तो पाटलाला सहाय्य करत असे. त्याला मिळालेल्या वतनाला लेखनवृत्ती म्हणत असत. गावचे सर्व दप्तर त्याच्याकडे असे. गावाच्या सर्व जमिनींची नोंद त्याच्याकडे असे. प्रत्येक गावाला कुलकर्णी असलाच पाहिजे असे दिसत नाही. कारण काहीवेळेला एकच कुलकर्णी अनेक गावांचे हिशेब ठेवत असे. जर एखाद्या कुलकर्ण्याला बरीच कामे असली तर तो आपल्या कामासाठी मुतालिक नेमत असे. कुलकर्णीपणाचे वतन हे वंशपरंपरेने चालत असलेले दिसते. काहीवेळा हे कुलकर्णी शिरजोरीने वागून लोकांना त्रास देत असत. असा उल्लेख काही ठिकाणी आढळतो. समजा एखाद्या कुलकर्णींचे घराणे निर्वंश झाले तर त्यांचे वतन संपूर्ण गावच्या मालकीचे होत असे.[३]

**३. चौगुला :-** हा गावातला महत्त्वाचा घटक असे. तो वतनदार आहे. मूळशब्द चौकुला असा आहे, म्हणजे चार कुळे बाळगणारा पाटलाचा सहाय्यक असे. काही ठिकाणी पाटलापेक्षा चौगुलाला जास्त मान मिळत असे. गावाची सारा वसुली करून दिवाणीत पोहोचवण्याचे काम चौगुल्याकडे असे. महत्त्वाच्या कागदपत्रांची ने-आण करणे, गावाची कोठारे, गोदामे व धान्याचे पेव याची व्यवस्था ठेवावी लागत असे. गोत सभेमध्ये त्याला पाटलानंतरचे स्थान मिळत. प्रत्येक गावाला चौगुला असेलच असे नाही. समाजातल्या वेगवेगळ्या जातींत चौगुले दिसून येतात.

**४. शेटे महाजन :-** शेटे महाजन हा गावच्या वतनदारांचा एक वर्ग असे. गावातील विविध पेठांचे हे वंशपरंपरागत अधिकारी असत. गावात जर पेठ वसवायची असेल तर यांनाच ते काम करावे लागत असे. पेठ वसवणे हे शेट्याचे मुख्य काम होय. त्या पेठेचा हिशेब ठेवण्याचे काम महाजनांचे असे. गोतसभेमध्ये अधिकृतपणे त्यांचा सहभाग असे.

**५. देशमुख :-** देशमुखी वतन हे सर्व वतनांत श्रेष्ठ वतन आहे.[४] देशमुख यांचा उल्लेख 'विषयपती' या संज्ञेने केला जात असे. देशमुखालाच कोकणामध्ये देसाई म्हणत असत व कर्नाटकात नाडगौडा म्हणत असत. कोकणातील देसाई ब्राह्मण असत. कर्नाटकातील नाडगौडा लिंगायत असत. तर महाराष्ट्रातील देशमुख बहुधा मराठे असत. देशमुखाला साधारणत: १) ज्या गावात पाटील नाही, त्या गावात पाटीलकीचे काम करावे लागत असे. २) देशमुख परगण्याचा वतनदार अधिकारी असे, त्यामुळे परगण्यातील वसाहत वाढविणे हे त्यातील मुख्य काम असे. ३) गावाची वांझोटी जमीन, गरजूंना लागवडीसाठी देण्याची योजना करावी लागत असे. ४) नवीन राहण्यासाठी आलेल्या रयतेला उत्तेजन देण्यासाठी थोडी जमीन क्रमाक्रमाने वाढवून दिली जात असे व त्याचप्रमाणे क्रमाक्रमाने सारा वाढवून वसूल करण्याचे काम देशमुखांचे असे, त्याला इस्तावा असे म्हणत असत. ५) दरवर्षी गावात दौरे काढून रयतेची स्थिती पाहणे हे त्यालाच करावे लागत असे. ६) गावातील कुलकर्णींनी काम नीट केले आहे की नाही हे पाहणे त्याचे काम असे. ७) पाटलाने गावाचे संरक्षण नीट केले आहे की नाही हे पाहणे त्याचे काम असे.

**६. देशपांडे[५] :-** देशपांड्यांना देश-कुलकर्णी म्हणत असत. गावातील काही जमीन त्याच्या मालकीची असे. संपूर्ण परगण्यातील कुलकर्ण्यांवर देखरेख करणे हे त्याचे मुख्य काम असे. छोट्या गावात कुलकर्ण्यांचे जे काम असे तेच काम संपूर्ण परगण्यात देशपांडे करीत असे. परगण्याचा हिशेब ठेवणे व तपासणे हे त्याचे मुख्य काम होय. त्याच्या कामात झालेल्या हयगयीबद्दल सरकार किंवा राजा त्याला जाब विचारत असे.

**७. मिरासदार :-** गावातील बहुसंख्य लोक मिरासदार असत. मिरासदार म्हणजे त्यांना जमिनी वंशपरंपरेने दिल्या असत. ते जमिनीचे मालक असून आपल्या जमिनीचा शेतसारा सरळपणे सरकारात जाऊन भरत असत. गोतसभेत हजर राहून गावाच्या कामात मदत करीत असत. मिरासदारांना त्यांच्या शेतीच्या किंवा इतर कामात मदत करण्यासाठी जे लोक बाहेरगावाहून येत असत, त्यांना उपरे म्हणत असत. गावाची वांझट किंवा पडीक जमीन त्यांना कसण्यासाठी देत असत. जर कालांतराने त्या पडीक जमिनीची मालकी त्यांना मिळाली तर उपरे लोक मिरासदार होत असत.

**८. बलुतेदार :-** बलुतेदारांमध्ये साधारणत: बाराजण येत असत. त्यामध्ये सोनार, जंगम, शिंपी, कोळी, तराळ, माळी, डावरी, गोसावी, घडसी, रामोशी, तेली, तांबोळी व गोंधळी यांचा समावेश असे. त्याप्रमाणे गुरव हा धार्मिक सेवक गावातल्या दैवतांची पूजा करण्याचे काम करीत असे. ठाकूर हा जंगलात राहणाऱ्या जमातीचा पुढारी असे. जंगम हा लिंगायत लोकांचा पुरोहित होता. मुलाणी हा गावातील मशिदीची व कब्रस्तानाची देखरेख करत असे.

वरील सर्व लोकांना अलुतेदार असे म्हणत असत. म्हणजेच अलुतेदार व बलुतेदार यांनी बनलेला गाव असे व यांनाच कारू व नारू असे म्हणत असत.[६]

मराठ्यांच्या राज्यकारभारासंबंधीच्या धोरणावरून लोककल्याणकारी राज्यकारभाराची ओळख पटते. विशेषत: छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य हे देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी किंवा चौगुले यांच्या कल्याणासाठी नव्हते. गावोगावी असलेली वतनदार मंडळी कधीही दु:खी कष्टी व दरिद्री दिसत नव्हती. कारण वतनदारांनी करवसुली न्यायदान अधिकार स्वत:कडे ठेवून जनतेला वारंवार त्रास होऊ नये याकरिता छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदार पद्धतीला फाटा दिला. काही ठिकाणी जुनी वतने रद्द केली. नवीन वतने देण्याचे टाळले. सामान्य जनतेला सुखी करणे हे शिवरायांचे ध्येय होते. त्याप्रमाणेच त्यांची प्रशासकीय मंडळी काम करीत. स्वराज्यातील

जमिनीची मोजणी करून प्रतिवारी ठरविली. म्हणजे उत्पन्नाचा निश्चित हिस्सा महसूल आकार म्हणून ठरविला. शिवाजी महाराजांनी सामान्य दर्जाच्या अधिकाऱ्यांपासून ते अष्टप्रधान मंडळातील पेशव्यांपर्यंत रोख वतन देण्याची पद्धत सुरू केली व वतन म्हणून जमीन देण्याची पद्धत बंद केली. रयतेची पिळवणूक कमी झाली, भ्रष्टाचार कमी झाला. गरीब रयतेकरिता आदर्श शासनपद्धती उभी केली. उदा. प्रभावळीचा सुभेदार रामजी अनंत व चिपळूणच्या छावणीतील लष्करी अधिकारी यांना पाठविलेल्या एका पत्रात शिवाजी महाराजांचा कल्याणकारी दृष्टिकोन स्पष्ट दिसतो. त्या पत्रात ते असे लिहितात, **भाजीच्या देठालाही मन दाखविता कामा नये, रयतेचा वाटा रयतेला जावा व सरकारचा वाटा सरकारला जावा, फुकट वस्तू घ्यायला जाल, दाम मोजून वस्तू घ्या, शेतकऱ्याला लुबाडाल, कणीस कापून न्याल, असा लोकांना त्रास द्याल तर मोगलाई बरी, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची कल्पना स्पष्ट होते.**[७] मराठ्यांचे स्वराज्य व मोगलाई यातील फरक जाणवतो.

छत्रपती शिवाजी महाराजांची ही स्वराज्याची कल्पना संभाजी महाराजांनी चालविली, तिचाच पाठपुरावा छत्रपती राजाराम महाराजांनी केला व त्यांच्या पश्चात महाराणी ताराबाईंनी मराठ्यांच्या स्वराज्याचे जतन केले. पुढे छत्रपती संभाजीमहाराज, शाहुमहाराज यांनी मराठ्यांच्या स्वराज्याचे धुरीणित्व स्वीकारले. तांत्रिकदृष्ट्या छत्रपती शाहू महाराज हे पहिल्या तीन छत्रपतींसारखे स्वतंत्र राजासारखे प्रशासकीय कार्ययंत्रणेत ठामपणे काही निर्णय घेऊ शकले नाहीत. उदा. राज्यकारभाराची सर्व जबाबदारी त्यांनी अष्टप्रधान मंडळातील पेशव्यांवर टाकली. छत्रपती शाहूंच्या काळात मराठ्यांनी मोगल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार प्राप्त केले, परंतु त्यामुळे सरदारांना मिळणाऱ्या सनदांच्या राजकारणामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे तत्त्व सुटले. अष्टप्रधानमंडळ पद्धती क्रमश: लुप्त होत चालली. छत्रपती शाहूंनी पेशव्यांवर विश्वास टाकून त्यांच्या हाती सर्व सत्ता दिली. जुन्या मंडळींना फाटा देऊन नव्या कर्तबगार मंडळींना हाताशी धरून मराठा मंडळाचा विस्तार केला. पेशव्यांनी महादजी शिंदे, मल्हारराव होळकर, परसोजी भोसले, गायकवाड, पवार इत्यादींच्या मदतीने स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर केले.[८] परंतु छत्रपतीशिवाजी महाराजांचे धोरणात्मक सूत्र कोठेतरी हरविल्याचे दिसते. त्याची परिणिती इ. स. १८१८ मध्ये झाली. पेशवाई संपली. या सबंध घडामोडींमध्ये ज्या ज्या सरदारांनी स्वत:च्या पराक्रमाने जी जी भूमी व्याप्त केली होती किंबहुना स्वत:च्या पराक्रमांनी मूळच्या वतनदारीमध्ये वाढ करून स्वत:चे असे वेगळेच साम्राज्य निर्माण केले व त्यातूनच संस्थानिकांची निर्मिती झाली.

### संदर्भ ग्रंथ सूची :-


१. गायकवाड आर. डी., सरदेसाई, बी. एन., थोरात डी. के., हणमाने बी. एन., मराठे कालीन संस्था व विचार, १९९०, कोल्हापूर, एन. व्ही. फडके आणि कंपनी, पृष्ठ क्र. १६८

२. जोशी शं. ना., मराठेकालीन समाजदर्शन, १९६०, पुणे, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पृष्ठ क्र. ६ व ८

३. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, पुणे, १९९१, राजहंस प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ३० ते ३४

४. जोशी शं. ना., मराठेकालीन समाजदर्शन, १९६०, पुणे, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पृष्ठ क्र. ५१

५. सेन सुरेंद्रनाथ यांच्या Administrative System of Maratha 1925 यांच्या ग्रंथाचा अनुवाद, डॉ. शिंदे सदाशिव यांनी २०१५ मध्ये केला, स्नेहल प्रकाशन, पृष्ठ क्र. १५४

६. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, पुणे, १९९१, राजहंस प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. २९

७. गायकवाड आर. डी., सरदेसाई बी. एन., थोरात डी. के., हणमाने बी. एन., मराठे कालीन संस्था व विचार, १९९०, कोल्हापूर, एन. व्ही. फडके आणि कंपनी, पृष्ठ क्र. १४०

८. रानडे महादेव गोविंद, (न्यायमूर्ती) मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, १८९७, पुणे, यांचा ग्रंथ आपटे रामचंद्र मोरेश्वर, इनामदार रामचंद्र नरसिंह, विजापूरकर विष्णू, यांनी १९२५ मध्ये अनुवादित केले. प्रकाशक : शंकर नरहर जोशी, पुणे ३०, पृष्ठ क्र. ६२